# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय: स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे 401101.


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.

दिनांक:- / /2021

प्रति,
**मा.महापौर,**
मिरा भाईंदर महानगरपालिका.

**विषय:- सर्वसाधारण सभेसाठी गोषवारा सादर करणेबाबत.**
**संदर्भ:- जा.क्र.मनपा/महापौर/563/2021-22 दि.22/11/2021 रोजीचे पत्र.**

महोदया,

उपरोक्त विषयी व संदर्भान्वये कळविणेत येते की, दि.01/12/2021 रोजी आयोजित केलेल्या मा.महासभेमध्ये विषय क्र.63, 64, 65, 66, 67, 68, 69, 70 हे प्रशासनाच्या दृष्टीने महासभेच्या धोरणात्मक निर्णयाकरिता पाठविणेत आलेले आहेत. तसेच सदर विषयाचे सविस्तर गोषवारे यापुर्वीच देणेत आलेले आहेत. तथापि, संदर्भिय पत्राद्वारे विषय क्र. 61, 62, 71, 72, 73, 74, 75, 76, 77, 78, 79 चे अभिप्रायासह गोषवारा सादर करणेबाबत कळविले आहे, परंतु सदर विषय हे प्रशासनाने आपल्याकडे महासभेच्या मान्यतेसाठी पाठविणेत आले नसल्याने प्रशासनास सदर विषयाचे गोषवारे सादर करणे शक्य नाही. तथापि, सदर विषयाशी संबंधित वस्तुस्थितीबाबतचा अहवाल मा.महासभेच्या माहितीसाठी या पत्राद्वारे सादर करीत आहे.

(दिलीप ढोले)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

**सोबत:- विषयनिहाय वस्तुस्थितीचा अहवाल.**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## पाणी पुरवठा विभाग
### // टिप्पणी //

**विषय :- मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील नवीन जलजोडणी मंजूरी बंद असलेबाबत...**
**संदर्भ :- १) मा. आयुक्त सो यांचे जा.क्र.मनपा/आयुक्त/१९३/२०११-१२ दि.०४/१०/२०११ रोजीचे आदेश.**
**२) मा. आयुक्त सो यांचे जा.क्र.मनपा/आयुक्त/११८/२०२१-२२दि.०१/११/२०२१ रोजीचे आदेश.**

१) मिरा-भाईंदर शहरास स्टेम वॉटर डिस्ट्रीब्युशन अॅन्ड इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी प्रा.लि. यांच्याकडून ८६ द.ल.लि. व महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडाळ यांच्याकडून १२५ द.ल.लि.असा एकूण २११ द.ल.लि. पाणी पुरवठा मंजूर आहे. परंतु शहरास सद्यस्थितीत प्रत्यक्षात सरासरी १८५ते १९० द.ल.लि. पाणी पुरवठा होत असून सद्याच्या लोकसंख्यानुसार जवळपास २१६ द.ल.ली. पाण्याची आवश्यकता आहे. म्हणजेच पाण्याच्या मागणीपेक्षा जवळपास सरासरी २६ ते ३१ द.ल.ली प्रतिदिन पाणी पुरवठा कमी होत आहे.

२) त्यातच मागील काही दिवसात महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडाळ त्यांच्या जलवाहिनीवरील तातडीची देखभाल दुरुस्तीची कामे करण्यासाठी वारंवार शटडाऊन घेतले होते. उदा. दि. ०७/१०/२०२१ रोजी २४ तासांचा शटडाऊन घेतला होता. मात्र सदरचे शटडाऊन लगतच ब्रेकडाऊन झाल्याने शहरातील पाणी पुरवठा मोठया प्रमाणात विस्कळीत होऊन शहरात ३ ते ४ दिवस पाणी पुरवठा बंद होता.

३) यास्तव शहरातील नागरीकांमध्ये असंतोष निर्माण होऊन तक्रारीत भरपूरप्रमाणात वाढ झालेली होती. तसेच याबाबत लोकप्रतिनिधी यांनी शहरास होणाऱ्या पाणी पुरवठा सुरळीत / वाढ होईतोपर्यत नवीन जलजोडण्या बंद ठेवण्याची मागणी / विनंती केलेली होती.

४) या अनुषंगाने अवगत करण्यात येते की, महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडाळाची जीर्ण झालेली जलवाहिनी जी वारंवार फुटून पाणी पुरवठा विस्कळीत होत असतो. सदरची जलवाहिनी बदण्याचे काम महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडाळाने हाती घेतलेले आहे. सदरची जलवाहिनी कार्यान्वीत करण्यासाठी महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडाळास वारंवार शटडाऊनची गरज लागणार आहे. त्यामुळे पुढे काही महिने महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडाळ वारंवार शटडाऊन घेणे अपेक्षीत आहे.

५) तसेच शहराची भविष्यातील पाण्याची गरज भागविण्यासाठी सुर्याधरणातून २१८ द.ल.ली. पाणी मंजूर आहे. सदरचे पाणी शहरास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत शहराच्या वेशीपर्यंत आणू देणार आहे. त्यासाठीची कामे प्रगतीपथावर असून सदरचे पाणी शहरास उपलब्ध होण्यासाठी लक्षणीय कालावधी अपेक्षीत आहे.

६) तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत शहरापर्यंत पोहचविण्यात येणारे पाणी शहरामध्ये वितरीत करण्यासाठी आवश्यक असणारी वितरण व्यवस्था जलकुंभ व अनुषंगीक कामे मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत करण्यासाठीचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार असून लवकरच प्रत्यक्ष कामास सुरुवात होणे अपेक्षीत आहे.

७) यापुर्वी देखील अशाच कारणास्तव दि. ०४/१०/२०११ पासून शहरातील नवीन जलजोडण्या देण्याचे मा. आयुक्त यांच्या आदेशान्वये स्थगीती दिलेली होती. सदरची स्थगीती शहरास अतिरिक्त ७५ द.ल.ली. पाणी पुरवठा चालू झाल्यानंतर दि. ३०/०४/२०१७ पासून पुन्हा नवीन जलजोडण्या देण्याचे चालू करण्यात आले होते. सदरच्या दिनांकापासून ते दि.२०/१०/२०२१ पर्यंत जवळपास ९७२५ नवीन जलजोडण्या मंजूर करण्यात आलेल्या आहेत.

८) शहरातील नवीन जलजोडण्यात वाढ झाल्यामुळे जलवाहिनीवरील पाण्याचा दाब देखील काही प्रमाणात कमी होऊन पाणी पुरवठा कमी प्रमाणात होत आहे. त्यामुळे देखील नागरीकांच्या तक्रारीत वाढ झालेली आहे.

९) तरी ज्याप्रमाणे यापुर्वी प्रशासनामार्फत पाण्याची मागणी व पुरवठा यामध्ये तफावत असल्याने नवीन जलजोडण्यास स्थगिती दिली होती व पाणी पुरवठयात वाढ झाल्यानंतर पुन्हा नवीन जलजोडण्या मंजूरी चालू करण्यात आली होती. त्याच प्रमाणे सद्यस्थितीत देखील मागणी इतका पाणी पुरवठा उपलब्ध होईतोपर्यंत म्हणजेचे महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडाळाकडून उर्वरीत २५ ते ३० द.ल.ली. पाण्यात वाढ होईतोपर्यंत नवीन जलजोडण्यास स्थगिती देणे योग्य राहील असे वाटते.

(सुरेश वाकोडे)
कार्यकारी अभियंता (पा.पु.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.

जा.क्र.मनपा/उपायुक्त(कर)/ ७६ /2021-22 दि.२८/11/2021

(62)

प्रति,

मा. महापौर,

मिरा भाईंदर महानगरपालिका.

विषय :- मिरा भाईंदर क्षेत्रातील पार्कींग जागेचा समावेश असलेल्या मालमत्ता धारकांना आकारण्यात येणाऱ्या पार्कींग जागेची कर आकारणी स्थगिती देणेबाबत.

संदर्भ :- 1.आपलेकडील जा.क्र.मनपा/महापौर/525/2021-22, दि.11/11/2021 रोजीचे पत्र.
2.या कार्यालयाकडील जा.क्र.मनपा/उप-आयुक्त/70/2021-22, दि. 24/11/2021 रोजीचे शुध्दीपत्रक.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपण उपस्थित केलेल्या मुद्दयाच्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिकेतील कर विभागाचा अभिप्राय आपले माहितीस्तव सादर करण्यात येत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण क्र. 11 नगरपालिका कराधान यातील कलम 127 (अ), 128 (अ), 128अ(2) या तरतुदीचे कृपया अवलोकन करावे.

त्यानुसार मालमत्ता कर आकारणी करणेबाबत महानगरपालिकेस क्षेत्रामधील सर्व मिळकतींना कर आकारणी करण्याचा अधिकार प्राप्त आहे. त्याचप्रमाणे 128अ(2) नुसार मालमत्ता बसविण्याच्या प्रयोजनासाठी "इमारत" या शब्दप्रयोगामध्ये सदनिका, गाळा, युनिट किंवा इमारतीचा कोणताही भाग नमूद आहे. त्यानुसार महानगरपालिका क्षेत्रामधील सर्व प्रकारच्या वापरकर्त्यांना मालमत्ता कर आकारण्याचा अधिकार महानगरपालिकेस प्राप्त आहे.

मालमत्ता कर हे महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत्र असून महानगरपालिकेची विविध विकासक कामे तसेच इतर आवश्यक कामांकरीता खर्च करावयाची रक्कम वसूल करण्यात आलेल्या मालमत्ता कर रक्कमेतुन तसेच शासनाद्वारे प्राप्त अनुदानातुन खर्च करण्यात येते.

मिरा भाईंदर शहरामध्ये मोठ्या प्रमाणावर गृह संकुले उभी राहत असून वाढत्या गृह संकुलनामध्ये परिसरात रस्ते, गटारे, दिवाबत्ती, पाणी पुरवठा आदी सुविधा महानगरपालिकेचे मर्यादीत उत्पन्न त्या तुलनेत होणारा वाढता खर्च तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेने विविध प्रकल्पांसाठी घेण्यात आलेले कर्ज व घेतलेल्या कर्जाची परतफेड व बांधील खर्च विचारात घेता सध्याच्या उत्पन्नामधुन महानगरपालिकेला आर्थिकदृष्टया कारभार सांभाळणे अडचणीचे झालेले आहे. तसेच यापूर्वी महानगरपालिकेस रोखीत प्राप्त होणारे जकात / स्थानिक संस्था कराचे उत्पन्न बंद झाले असून त्यासाठी शासनाच्या अनुदानावर अवलंबुन रहावे लागत आहे.

शहरामध्ये विविध गृहसंकुल, व्यापारी संकुल याठिकाणी विकासकाव्दारे वापरकर्त्यास पार्किंगची जागा विकली जाते, वाटप (allotment) केली जाते. मोठ्या व्यापारी संकुलामध्ये एकत्र पार्किंगच्या जागेवर सामान्य नागरिकांकडून पार्किंग शुल्क देखील आकारले जाते.

सबब, महापालिकेस प्राप्त अधिकारानुसार उक्त पार्किंगच्या जागेवर कर आकारणी करणे आवश्यक होते. तथापी यापुर्वी कराची आकारणी करत असताना पार्किंगच्या जागेचा समावेश करण्यात येत नव्हता. सदयस्थितीत महापालिकेच्या उत्पन्नामध्ये वाढ होण्याच्या दृष्टिने पार्किंग वरील कर आकारणी सुरु करणे क्रमप्राप्त आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका लगतच्या महानगरपालिका उदा. ठाणे महानगरपालिका, नवी मुंबई महानगरपालिका, उल्हासनगर महानगरपालिका, कल्याण-डोंबीवली महानगरपालिका व पनवेल महानगरपालिका क्षेत्रात ज्या इमारती मधील सदनिका / शॉप यांच्या खरेदी पत्रामध्ये समर्पित पार्कींग जागेचा उल्लेख आहे अशा मालमत्तेच्या मालमत्ता करामध्ये करयोग्य मूल्यावर दर निश्चित करुन पार्कींग कर आकारण्यात येत आहे.

सबब महानगरपालिका क्षेत्रामधील ज्या मिळकत धारकांना स्वतंत्र पार्कींग उपलब्ध झालेली आहे त्यांना प्रचलित दराने म्हणजेच रहिवाशी किंवा वाणिज्यीक दराने कर आकारणी करणे आवश्यक होते. तथापि सदरची कर आकारणी मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये आकारण्यात येत न... महानगरपालिकेने रहिवाशी, वाणिज्य वापराच्या मालमत्ताचे दर यापुर्वी मा. महासभा ठराव क्र. 71, दि.31/10/2011 व मा. विशेष महासभा ठराव क्र. 60, दि. 20/02/2018 अन्वये निश्चित करुन दिलेले आहेत. प्रस्तावित पार्कींगचा मालमत्ता दर हा नविन कर नसून मिळकतीच्या काही भागासाठी आकारण्यात येत नसलेल्या पध्दतीमध्ये बदल आहे.

दि. 16/11/2021 रोजी मा. महापौर यांनी महानगरपालिकेमधील मा.उपमहापौर, मा.सभापती व सर्व प्रभाग समिती सभापती तसेच मा. आयुक्त, मा. अति. आयुक्त व उपायुक्त यांची बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीमध्ये पार्कींग जागेच्या वाढीव कराच्या बाबतीत तज्ज्ञांचे कायदेशीर मत घेतल्यानंतर अंमलबजावणी करावी असे ठरलेले आहे. त्यानुसार दि. 24/11/2021 रोजी उपायुक्त यांनी दि. 21/10/2021 रोजीच्या परिपत्रकाबाबत शुध्दीपत्रक जारी केलेले आहे. त्यानुसार पुढील अंमलबजावणी करण्यात येईल.

आपल्या माहितीस्तव सादर.

(रवि पवार)
उपायुक्त (कर)
मिरा भाईंदर महानगरपालिका

सोबत : दि. 24/11/2021 रोजीचे शुध्दीपत्रक जोडत आहे.

प्रत माहितीस्तव :-

1. मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका
2. मा. अति. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका
3. मा. उपमहापौर, मिरा भाईंदर महानगरपालिका
4. मा. विरोधी पक्षनेता, मिरा भाईंदर महानगरपालिका
5. मा. ॲड. रवि व्यास, जिल्हा अध्यक्ष, भारतीय जनता पार्टी (मिरा भाईंदर शहर)
6. श्रीम. डिम्पल विनोद मेहता, माजी महापौर, मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

उप.आयुक्त (कर) यांचे कार्यालय,
जा.क्र.मनपा/उप.आयुक्त/ ७०/2021-22
दि. २४/10/2021

# शुद्धिपत्रक

संदर्भ :- जा.क्र./मनपा/उप.आयुक्त(कर)/10/2021, दि.21/10/2021 रोजीचे परिपत्रक.

उप.आयुक्त कार्यालयाने यापुर्वी दि.21/10/2021 रोजी पारित केलेल्या आदेशाबाबतीत मा.महापौर महोदय यांनी आयोजित केलेल्या बैठकीमध्ये ठरल्याप्रमाणे तज्ञांची कायदेशीर मत घेतल्यानंतर पुढील उचित तो निर्णय घेण्यात येईल. सबब दि.21/10/2021 रोजी काढण्यात आलेले परिपत्रक तुर्तास स्थगित करण्यात येत आहे. याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

(रवि पवार)
उप.आयुक्त (कर)
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा.महासभा दि.01/12/2021 सभा सुचना क्र.06**

**विषयपत्रिका**

| प्रकरण क्र. | विषय | माहिती |
|---|---|---|
| 71 | महानगरपालिकेमार्फत करण्यात येणारा ट्राफीक वॉर्डन पुरवठा बंद करणेबाबत. | ➢ मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात वाहतुक नियंत्रण करणेकामी पोलीस वाहतुक विभागकडे अत्यंत अपुरा कर्मचारी वर्ग असल्याने सदर विभागाच्या विनंतीवरुन सन 2011-12 पासुन वाहतुक विभागाच्या मदतीसाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत दररोज 50 ट्राफिक वॉर्डन उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.<br>➢ निविदा प्रक्रियेव्दारे ट्राफिक वॉर्डन पुरवठा कंत्राटदारामार्फत करणेत येतो.<br>➢ ट्राफिक वॉर्डनची नेमणूक व संपुर्ण नियंत्रण पोलीस निरीक्षक, वाहतुक विभाग यांचे असते.<br>➢ सन 2011-12 ते आजपर्यंत महापालिकेच्या जवळपास 17 कोटी खर्च झालेला आहे.<br>➢ सद्यस्थितीत वार्षिक खर्च जवळपास रु.1.65 कोटी<br>➢ सद्यस्थितीत कंत्राटदाराचे नाव - मे अल्फा गार्डस सर्व्हीसेस प्रा.लि.<br>➢ सद्यस्थितीत ट्राफिक वॉर्डन कार्यरत - 50<br>➢ वापरण्यात येत असलेली तरतुद - बांधकाम अस्थायी आस्थापना/सुरक्षा व्यवस्था<br>➢ प्रति ट्राफिक वॉर्डन दर- रु.890/- प्रतिदिन<br>➢ कंत्राटाची मुदत - दि.11/03/2019 ते दि.10/03/2022 |

| | | |
|---|---|---|
| | | ➢ माहे ऑक्टोबर 2020 पर्यंतची देयके कंत्राटदारास अदा करण्यात आलेली आहेत. माहे नोव्हेंबर 2020 ते जुलै 2021 देयके प्रस्तावित केलेली आहेत.<br>➢ ऑगस्ट 2021 ते ऑक्टोबर 2021 ची देयके कंत्राटदाराकडून अद्याप सादर करण्यात आलेली नाहीत. |

(मारुती गायकवाड)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग

**// टिपण्णी //**

**मा. महासभा बुधवार दि. ०१/१२/२०२१ रोजी आयोजित सभेतील विषय**

| प्रकरण क्र. | विषय | स्पष्टीकरण |
|---|---|---|
| ७२ | शहरातील मैदाने, गार्डन, स्मशानभूमी, दुभाजके यांच्या देखभाल व निगा कामाच्या निविदेस अंदाजपत्रकात कामाकरीता तरतुद नसताना देयके अदा करण्यात आलेबाबत विचार विनीमय करुन निर्णय घेणे. | मिरा भाईंदर महानगरपलिका क्षेत्रातील उद्याने, मैदाने, स्मशाने व दुभाजके यांची निगा व देखभाल २ वर्ष कालावधीकरीता करणेकामी महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. मिभाम-११२०/प्र.क्र./४६/नवि-२८ दि.०२/०३/२०२१ अन्वये आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी सादर केलेल्या गोषवाऱ्यानुसार व निविदेतील अटीशर्तीप्रमाणे शासनाने निविदा मंजुर केली आहे. मा.स्थायी समिती प्रकरण क्र. ३० दि.१७/०८/२०२० मधिल गोषवाऱ्यानुसार मे. निसर्ग लॅण्डस्केप सर्व्हिसेस यांची कमी दराची निविदा मंजुर केली आहे. त्यानुसार मा. आयुक्त सो. यांच्या दि.३१/०३/२०२१ रोजीच्या मंजुरीने करारनामा करुन दि.१२/०४/२०२१ रोजी कार्यादेश देण्यात आला आहे.<br>तसेच शासनाने मंजुरी दिल्यानुसार व गोषवाऱ्यात नमुद लेखाशिर्षक उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागातील "मजुर पुरवठा", "लालमाती / शेणखत / सफेदरेती पुरवठा करणे", "उद्याने, दुभाजक, सुशोभिकरण करणे." या लेखाशिर्षा खाली करण्यात आलेल्या तरतुदी मधुनच निगा देखभालीची देयके अदा करण्यात आले आहे. |
| ७४ | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागात निविदांची मुदत संपलेली असुनही नियमबाह्य मुदतवाढ देणे व मुदतवाढ नसतानाही देयक अदा केलेल्या संबंधीतांवर कारवाई करणेबाबत विचार विनीयम करुन निर्णय घेणे | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यावरील झाडांची निगा व देखभाल करणे करीता मजुर पुरवठा करणेकामी मा. महासभा ठराव क्र. ४८ दि.३०/०३/२०२१ अन्वये आर्थिक व प्रशासकीय मान्यतेनुसार ई-टेंडरींग ऑनलाईन पध्दतीने निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. त्याप्रमाणे मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. ८४ दि.२९/०९/२०२१ अन्वये मान्यतेने मे. हिरावती इंटरप्रायजेस यांचा सोबत करारनामा करुन कार्यादेश देण्यात आलेला आहे. त्यानुसार मजुर पुरवठा करुन वृक्ष प्राधिकरण विभागाचे काम करण्यात येत आहे.<br>तत्पुर्वी पावसाळ्याच्या आपतकालीन कालावधीमध्ये फक्त ४ महिन्याकरीता मे. एम.ई.प्रोजक्ट या ठेकेदार मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. १८ दि. ०५/०५/२०२१ अन्वये मंजुरी दिलेल्या दराप्रमाणेच मा.आयुक्त यांच्या मान्यतेने कार्यादेश देवुन आपतकालीन कालावधीतील कामे करण्यात आलेली आहेत. |

(संजय शिंदे)
उप. आयुक्त (उद्यान)
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा.महासभा दि.01/12/2021 सभा सुचना क्र.06**

**विषयपत्रिका**

| प्रकरण क्र. | विषय | माहिती |
|---|---|---|
| 73 | आकृतीबंधामध्ये मंजूर पदापेक्षा जास्त पदांवरील उपायुक्तांना शासनाच्या सेवेत वर्ग करुन महापालिकेतून कार्यमुक्त करणेबाबत निर्णय घेणे. | नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.36(भाग-1)/16/नवि-28, दि. 26 फेब्रुवारी, 2019 नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विभागांकरीता विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यास व महानगरपालिकेच्या आकृतीबंधास मान्यता प्राप्त झाली आहे. तसेच नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.35/16/नवि-28, दि. 28 मे, 2019 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम- 2019 नुसार उपायुक्त (गट-अ) या पदासाठी खालीलप्रमाणे अर्हता विहित करण्यात आली आहे. |

| सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी<br>1. नामनिर्देशन<br>2. पदोन्नती<br>3. प्रतिनियुक्ती | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती |
|---|---|---|---|
| प्रशाकीय सेवा श्रेणी-01 | उपायुक्त | पदोन्नती 50% | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सहा.आयुक्त या पदावर किमान 05 वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| | | प्रतिनियुक्ती 50% | राज्य शासन/स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सेवेतील समकक्ष पद किमान 03 वर्षे धारण करणाऱ्या योग्य अधिकाऱ्याची शासनाकडून प्रतिनियुक्तीने नियुक्ती करता येईल. |

| | | |
|---|---|---|
| | | मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत आकृतीबंधानुसार उपायुक्त या संवर्गातील एकुण 04 पदे मंजूर असून, मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम- 2019 नुसार उपायुक्त (गट-अ) या संवर्गाची 50% याप्रमाणे 02 पदे मुख्याधिकारी संवर्गातून भरण्याची व 50% याप्रमाणे 02 पदे पदोन्नतीने भरावयाचे आहेत.<br><br>[see table below]<br><br>1. श्री. स्वप्निल सावंत :- ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालयामार्फत चौकशी सुरु असल्यामुळे पदोन्नतीस अपात्र<br>2. श्री. संजय दोंदे :- ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालयामार्फत चौकशी सुरु असल्यामुळे पदोन्नतीस अपात्र<br>3. श्री. सुनिल यादव :- ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालयामार्फत चौकशी सुरु असल्यामुळे पदोन्नतीस अपात्र<br>4. श्री. दिलीप जगदाळे :- ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालयामार्फत चौकशी सुरु असल्यामुळे पदोन्नतीस अपात्र |

| अ.क्र. | पदोन्नती/प्रतिनियुक्ती | नाव व पदनाम |
|---|---|---|
| 1. | प्रतिनियुक्ती (एकुण 02 पदे) | 1. श्री. मारुती गायकवाड, मुख्याधिकारी, गट-अ (बदलीने नियुक्ती)<br>2. श्री.संजय शिंदे, मुख्याधिकारी, गट-अ (बदलीने नियुक्ती)<br>3. श्री.अजित मुठे, विशेष लेखापरीक्षक, वर्ग-01 सहकार विभाग (प्रतिनियुक्तीने)<br>4. श्री. रवि पवार, मुख्याधिकारी, गट-अ (प्रतिनियुक्तीने, महानगरपालिकेकडील अधिकारी पदोन्नतीने उपलब्ध होईपर्यंत नेमणूक) |
| 2. | पदोन्नती (एकुण 02 पदे) | मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर उपायुक्त या पदावर पदोन्नती देण्यासाठी पात्र उमदेवार उपलब्ध नाही. |

(मारुती गायकवाड)
उप.-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.महासभा दि.01/12/2021 सभा सुचना क्र.06

विषयपत्रिका

| प्रकरण क्र. | विषय | माहिती |
|---|---|---|
| 74 | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागात निविदांची मुदत संपलेली असुनही नियमबाह्य मुदतवाढ देणे व मुदतवाढ नसतानाही देयक अदा केलेल्या संबंधीतांवर कारवाई करणेबाबत विचार विनीमय करुन निर्णय घेणे. | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापना विभागात खालीलप्रमाणे ठेका पध्दतीने कर्मचारी कार्यरत आहेत. |

| अ.क्र | ठेकेदराचे नाव | ठराव | ठेका पध्दतीने पुरवठा कर्मचारी संख्या | एकुण खर्च |
|---|---|---|---|---|
| 1. | मे.सैनिक इंटेलिजन्स अँण्ड प्रा.लि | दि.31/07/2018 रोजी कंत्राटाची मुदत संपुष्टात आलेली असुन सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा यांना बाउंसर/ पहारेकरी पुरवठा करणेबाबत पत्र देण्यात आलेले असुन सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा यांचेकडून माहिती येऊन पुढील कार्यवाही करेपर्यंतच्या कालावधीसाठी कंत्राटदारास मा.महासभा दि.03/11/2018, प्रकरण क्र.101, ठराव क्र.100 अन्वये मुदतवाढ व वेळोवेळी देयक अदा करणेस मंजूरी देण्यात आलेली आहे. | सुरक्षा रक्षक 694 | रु.18,22,66,608/- इतका अंदाजित वार्षिक खर्च आहे. |
| 2. | महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन | करारनाम्यानुसार मुदतवाढ दि.15/06/2021 ते दि.14/06/2022 | सुरक्षा रक्षक 246 | रु.7,09,56,000/- इतका अंदाजित वार्षिक खर्च आहे. |
| 3. | मे.सैनिक इंटेलिजन्स अँण्ड प्रा.लि | दि.02/05/2018 रोजीच्या आदेशान्वये कंत्राटदाराला ठेका देण्यात आला होता. सदर ठेकेदाराची मा.स्थायी समिती सभा दि.06/09/2019, ठराव क्र.77 अन्वये दि.30/10/2019 रोजीच्या आदेशान्वये निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मुदत देण्यात आलेली आहे. मा.महासभा दि.11/11/2020 ठराव क्र.15 अन्वये निविदा काढणेबाबत मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर ठेका कनिष्ठ अभियंता बाबतची निविदा प्रक्रियेची कार्यवाही पुर्ण होऊन कार्यादेश देण्याची प्रक्रिया सुरू आहे. | कनिष्ठ अभियंता 29<br>स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक 03 | रु.80,94,019/- इतका वार्षिक अंदाजित खर्च आहे. |
| 4. | मे.गणेश कृपा ट्रान्सपोर्ट | दि.02/12/2015 रोजीच्या आदेशान्वये कंत्राटदाराला ठेका देण्यात आला होता. सदर ठेकेदाराची मा.स्थायी समिती सभा दि.24/07/2019, ठराव क्र.39 अन्वये दि.15/07/2019 रोजीच्या | संगणक चालक तथा लिपीक 105 | 1. 89 कर्मचारी प्रमाणे रु.2,37,40,575/- |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | आदेशान्वये निविदा प्रक्रिया होऊन संबंधित निविदा धारकास कार्यादेश होईपर्यंत मुदत देण्यात आलेली आहे.<br>तसेच निविदेची कार्यवाही पुर्ण होऊन मा. स्थायी समितीपुढे गोषवारा ठेवण्यात आलेला आहे. त्यानुसार सदर विषयाबाबतच मंजुर ठराव प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल. | | 2. 105 कर्मचारी प्रमाणे रु.2,80,08,54C/- | |
| | | | 5. | मे. अल्फा गार्डस सर्व्हीसेस प्रा.लि. | मा. स्थायी समिती सभा दि.15/02/2019, ठराव क्र.169 अन्वये मे. अल्फा गार्डस सर्व्हीसेस प्रा.लि. यांच्या दराला मंजुरी दिलेली असल्याने दि.06/03/2019 रोजीच्या आदेशान्वये कंत्राटदारास एकुण 50 ट्राफिक वॉर्डन पुरवठा करणेबाबत दि.11/03/2019 ते दि.10/03/2022 पर्यंत मुदतीचा कार्यादेश देण्यात आलेला आहे. | ट्राफिक वार्डन 50 | रु.1,65,54,000/- इतका वार्षिक अंदाजित खर्च आहे. | |

(मारुती गायकवाड)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## वाहन विभाग

॥ टिप्पणी ॥

मा.महासभा बुधवार, दि.01/12/2021 रोजी आयोजित सभेतील विषय. क्र.74

| अनु क्र. | विभाग | विषय | तपशिल |
| --- | --- | --- | --- |
| 1) | वाहन विभाग | महापालिकेच्या विविध विभागात ठेका पद्धतीने वाहनचालक पुरवठा करणेकरिता वार्षिक निविदे बाबत. | • जा.क्र.मनपा/वाहन/253/2018-19 दि.21/12/2018 रोजीच्या वार्षिक कार्यादेशान्वये मे.सर्वस्व इंटरप्राजयेस यांना ठेका देण्यात आला. तद्नंतर जा.क्र.मनपा/वाहन/185/2019-20 दि.15/01/2020 रोजीच्या कार्यादेशान्वये संबंधित ठेकेदारास पुढील आदेश होईपर्यंत मुदतवाढ देण्यात आली.<br>• सदरील निविदा दि.28/08/2021 रोजी "दैनिक महाराष्ट्र सम्राट" व "द ग्लोबल टाईम्स" या स्थानिक वृत्तपत्रात व ई-टेंडरींग संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली.<br>• सदरकामी दोन निविदा प्राप्त झाल्याने पुनश्च: फेर निविदा दि.02/10/2021 रोजी "दैनिक परशुराम समाचार/दैनिक नवभारत" या वृत्तपत्रात तसेच ई-टेंडरींग संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली.<br>• सदरकामी 6 ठेकेदारांच्या (मे.डि.एम.इंटरप्रायजेस, मे.इगल एस.पी.एस इंडिया, मे.निसरग्लेन्ड स्केप प्रा.लि., मे.सर्वस्व इंटप्रेनर्स, मे.सिक्युअर 1 सिक्युरिटी सर्व्हिस, मे.टेकनो विन इट इन्फ्रा प्रायव्हेट) निविदा ई-टेंडरींग संकेतस्थळावर प्राप्त झाल्या.<br>• सदर प्राप्त निविदेची तांत्रिक छाननी केली असता मे.निसारग्लेन्ड स्केप प्रा.लि., मे.सर्वस्व इंटरप्रेनर्स व मे.टेकनो विन इट इन्फ्रा प्रायव्हेट या ठेकेदारांनी कागदपत्रांची पुर्तता केली नसल्याने त्यांच्या निविदा अपात्र ठरविण्यात येऊन ई.एम.डी. परतावा करण्यात आला.<br>• तसेच मे. मे.डि.एम.इंटरप्रायजेस, मे.इगल एस.पी.एस इंडिया आणि मे.सिक्युअर 1 सिक्युरिटी सर्व्हिस हे ठेकेदार पात्र असल्याने निविदा समिती यांच्या मान्यतेने दराचा लिफाफे उघडण्यात आले.<br>• प्राप्त निविदेतील दराचे लिफाफे उघडले असता |

| अनु क्र. | विभाग | विषय | तपशिल |
|---|---|---|---|
| | | | मे.सिक्युअर 1 सिक्युरिटी सर्व्हिस यांनी रु.23963/- (किमान वेतन प्राप्त दरानुसार) असल्याने सदरील निविदेस मा.निविदा समितीने मान्यता दिलेली आहे.<br>• उपरोक्त निविदेचा गोषवारा मा.आयुक्त यांचे दि.22/11/2021 रोजीच्या मंजुरीने स्थायी समिती सभेपुढे मान्यतेस ठेवणेकरिता दि.24/11/2021 रोजीच्या पत्रान्वये मा.नगरसचिव, नगरविकास विभाग यांना कळविण्यात आले. |
| 2) | वाहन विभाग | वाहने वाहनचालकासह व इंधनासह (संपूर्ण सेवा) भाडयाने घेणेबाबत. | • वाहने वाहन चालकासह संपुर्ण सेवा भाड्याने घेणेकामी मे.सिताराम ट्रॅव्हल्स यांना जा.क्र.मनपा/वाहन/74/2017-18 दि.29/06/2018 अन्वये वार्षिक कार्यादेश देण्यात आलेला असुन जा.क्र.मनपा/वाहन/16/2020-21 दि.17/04/2020 अन्वये पुढील आदेश होईपर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. |

(मारुती गायकवाड)
उपायुक्त (वाहन)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## नगररचना विभाग

## स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कूलच्या बाजूला, कनाकिया, मिरारोड (पु.)

## // टिप्पणी //

विषय - मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील इमारत बांधकाम प्रस्तावामध्ये आकारण्यात येणाऱ्या मालमत्ता कर अनामत शुल्काबाबत.

- मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) शासन अधिसूचना क्र. टीपीएस-1296/847/सीआर-162/96/युडी-12, दि.14/05/97 अन्वये मंजूर करण्यात आलेली असून ती दि.15/07/97 पासून अंमलात आलेली आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना क्र. टीपीएस-1298/941/सीआर-89/98/युडी-12, दि.25/08/2000 अन्वये मंजूर झालेली असून ती दि.15/10/2000 पासून अंमलात आलेली आहे.
- मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-1208/1346/प्र.क्र.267/08/नवि-12, दि.29/08/2009 अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.
- दि.29/08/2009 रोजीच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावली फेरबदलातील विनियम क्र.5.3x and xi (Appendix - 1) नुसार इमारत बांधकाम क्षेत्राकरीता अनामत रक्कम रु.20/- (प्रती चौ.मी.) याप्रमाणे वसुल करण्यात येते.
- मिरा भाईंदर महानगरपालिकेने पत्र क्र. मनपा/नर/34/2011-12 दि.07/04/2011 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील इमारतींस बांधकाम परवानगी देताना इमारत बांधकाम क्षेत्राकरीता मालमत्ता कर अनामत शुल्क रु.210/- (प्रति चौ.मी.) याप्रमाणे शुल्क आकारणे बाबत आदेश पारित करण्यात आलेले आहेत.
- सदरचे आदेश हे मिरा भाईंदर महानगरपालिका मंजूर विकास नियंत्रण नियमावली विनियम 5(3) (xi) नुसार आकारण्यात येत आहेत.
- सदरचे आदेश जे विकासक इमारती भोगवटा दाखला न घेता विकासक इमारती रहिवास व्याप्त करतात अश्या इमारतींस कर व शास्तीची रक्कम इमारतीमधील सदनिका धारकांकडून वसुल करण्यास लागू नये म्हणून लागू करण्यात आलेले आहेत.
- संदरची मालमत्ता कर अनामत रक्कम इमारतीस भोगवटा दाखला घेतल्यानंतर तीन वर्षानंतर विकासकास व्याजाची आकारणी न करता परत देणेबाबत नमुद केलेले आहे.
- सदर आदेशानुसार उपरोक्त रक्कम हि महानगरपालिकेच्या लेखा विभागाने स्वतंत्रपणे खाते निर्माण करुन जमा करुन घ्यावयाची आहे. तसेच उपरोक्त रक्कमेची इतर कोणत्याही कामासाठी खर्च करावयाचा नाही.
- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या नगररचना विभागामार्फत सन 2017-18 पासून सदर रक्कमेची वसूली करण्यात आलेली आहे. त्याबाबतचा वर्षनिहाय जमा रक्कमेचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | आर्थिक वर्ष | मालमत्ता कर जमा रक्कम |
|---|---|---|
| 1) | 2017-18 | रु.1,94,26,623/- |
| 2) | 2018-19 | रु.8,03,05,703/- |
| 3) | 2019-20 | रु.5,40,33,216/- |
| 4) | 2020-21 | रु.3,49,82,248/- |
| | **एकूण रक्कम** | **रु.18,87,47,790/-** |

- सदरची रक्कम हि अनामत रक्कम असल्यामुळे दि.07/04/2011 रोजीच्या आदेशानुसार उपरोक्त रक्कम इतर कामासाठी खर्च करता येणार नाही.

---------- XXX ---------

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय भाईंदर
### छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.). ता.जि. ठाणे. ४०१ १०१.

जा.क्र.मनपा/नर/ ३४ /२०११-१२ दिनांक - ०७/४/२०११

## // आदेश //

मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रासाठी मंजूर विकास योजनेतील विकास प्रस्तावांना मिरा भाईंदर शहरासाठी मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार परवानगी देण्यात येते. बांधकाम परवानगीमधील सर्व अटींची पूर्तता केल्यानंतर व इमारत मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार बांधकाम केलेले असेल तर, त्यास भोगवटा दाखला देण्यात येतो. विकासकाने जागेवर इमारतीचे बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे झालेला आहे. परंतू बांधकाम परवानंगी मधील अटींची पूर्तता विकासक करत नाहीत.

त्यामुळे अटीची पूर्तता केलेली नसल्यामुळे भोगवटा दाखला देता येत नाही. व जागेवरील इमारत विनापरवानगी रहिवाशी व्याप्त करीत असतात. कर विभागाकडून भोगवटा दाखला घेतलेला नसल्यामुळे इमारतीस कर व शास्तीची रक्कम रहिवाश्यांकडून वसूल करण्यात येते. त्यामुळे त्याचा आर्थिक भुर्दंड स्थानिक नागरीकांना सोसावा लागत आहे.

तरी मिरा भाईंदर शहरातील विकासकांस बांधकाम परवानगी देतेवेळी विकासकांकडून कर विभागाकडून आकारण्यात येणारी वार्षिक कराची रक्कम रु.२१०/- प्रति चौ.मी. प्रति तीन वर्षासाठी अनामत रक्कम म्हणून जमा करुन घ्यावी. विकासकाने इमारतीचे बांधकामास मंजूर नकाशाप्रमाणे केलेले असेल व बांधकाम परवानगी मधील सर्व अटींची पूर्तता करुन भोगवटा दाखला घेतल्यानंतर सदरची जमा केलेली मुळ अनामत रक्कम विकासकास परत करावी, अन्यथा भोगवटा दाखला न घेता रहिवास वापर चालू केल्यास सदरची अनामत रक्कम कराच्या स्वरुपात मिरा भाईंदर महानगरपालिकेत जमा करुन घ्यावी.

सदरची रक्कम ही लेखा विभागाने स्वतंत्रपणे खाते निर्माण करुन स्वतंत्र रक्कम जमा करुन घ्यावी. जमा रक्कमेचा तपशील नगररचना व लेखा विभागाने स्वतंत्र नोंदवहीद्वारे वेळोवेळी अद्यावत करुन ठेवण्यात यावी. सदरची सुरक्षा रक्कम अंदाजपत्रीकेत रक्कमेचे पूर्वनियोजित करतांना इतर कोणत्याही कामासाठी खर्च करणेत येवू नये. सुरक्षा रक्कम परत करतांना कोणत्याही व्याजाची आकारणी न करता विकासकास परत करणेत यावी.

सदरच्या आदेशाची दि.०६/०४/२०११ पासून काटेकोरप्रमाणे अंमलबजावणी करावी.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत - माहिती व कार्यवाहीसाठी
१) नगररचना विभाग
२) कर विभाग
३) लेखा विभाग

36

SECURITY DEPOSITS FOR DUE PERFORMANCE OF CONDIRTIONS

| Sr. No. | Part of building for security | Rate per sq.m. of relevant built up area | Period of deposit | Conditions forfeiture of deposit |
|---|---|---|---|---|
| 1 | Basement or stilt portion in all use zones | Rs.20/- | 3 years from the date of occupancy certificate | Basement and stilts used for non permitted uses Violations in the height of stilts. If stilts enclosed from three sides or more |
| 2 | Buildings or structures not under basement or stilt except in NDZ | Rs.10/- | 1 years form the date of occupancy certificate | It is forfeited either in part or whole at the discretion of Municipal Commissioner depending on the nature of violations |
| 3 | Buildings meant for hospitals, schools, colleges, nurseries and the buildings of charitable registered institutions I all use zone | Rs.5/- | 1 years from the date of occupancy certificate | It is forfeited either in part or whole at the discretion of Municipal Commissioner depending on the nature of violations |
| 4 | Buildings for residential use in NDZ | Rs. 5/- | 1 years from the date of occupancy certificate | It is the forfeited either in part or whole at the discretion of Municipal Commissioner depending on the nature of violations |

e) smoke stop lobby door, where provided;
f) refuse chutes refuse chamber, service duct, etc.
g) vehicular, loading and unloading parking spaces;
h) refuse area, if any
i) details of air-conditioning system with position of fire dampers, mechanical ventilation system, electrical services, (with dimensions of electrical transforming sub-stations etc.) boilers, gas pipes, meterrooms etc.:
j) details of exits, including ramps, etc. for hospitals and special risks;
k) location of generator transformer and switch gear room;
l) smoke exhaust system, if any;
m) details of fire alarm system;
n) location of centralised control, connecting all fire alarms built-in fire protection arrangements and public address system, etc.
o) location and dimensions of static water storage tank and pump room along withfire service inlets for mobile pump and water storage tank'
p) locationand details of fixed fire protection installation such as sprinklers, wet hose reels, drenchers, carbon-dioxide ($CO_2$) installations, etc.; and
q) location and details of first aid and fire fighting equipment installations.

vii) Service plan - Plan and sectional elevations of private Water supply, sewage disposal system and details of building services, where required by the Chief Officer shall be made available on a scale of not less than 1:100 before undertaking such work.

viii) Specifications - General specifications of the proposed construction,giving the type and grade of materials to be used in the form in Appendix VI signed by a licensed surveyor / engineer/ structural engineer / supervisor, or architect as the case may be,shall accompany the notice.

ix) Supervision Certificate - The notice shall be further accompanied by a certificate of supervision in the form in Appendix VII by the licensed surveyor / engineer / structural engineer/ supervisor or architect as the case may be. If the said licensed technical person or architect ceases to be employed for the development work. Further development, shall be suspended till a new licensed technical person or architect is appointed and his certificate of supervision alongwith a certificate for the previous work erected, if any, is accepted by the Chief Officer.

x) Development permission fee receipt. - The notice shall be accompanied by an attested copy of the receipt of payment of the development permission application fee.

xi). Security deposit - To ensure compliance with these Regulations and the directions given in the sanctioned plan and other conditions, a security deposit which may be in the form of an irrevocable bank guarantee, shall be charged at rate specified by the Chief Officer. It shall be returned to the owner one year after the issue of the full occupancy certificate after the Chief Officer is satisfied with the compliance with various conditions stipulated in the said full occupancy certificate.

xii) Clearance certificate for tax arrears. - The notice shall also be accompanied by an attested copy of a clearance certificate from the Assessment Department of the Municipal Council payment tax up-to-date.

xiii) No objection Certificate - For occupancies requiring clearance from authorities like the Civil Avitation Department Directorate of Industries, Maharashtra Pollution Control Board, inspectorate of Boilers and Smoke

# मिरा भाईदर महानगरपालिका

## मा.महासभा दि.01/12/2021

### अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग

| प्रकरण क्र. | विषय | माहिती |
|---|---|---|
| 76 | **आरक्षण क्र.364 विचारविनिमय करुन निर्णय घेणे.** | मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) शासन अधिसूचना क्र.टीपीएस-1296/847/सीआर-162/96/युडी-12, दि.14/05/1997 अन्वये मंजूर करण्यात आलेली असुन ती दि.15/07/1997 पासून अंमलात आलेली आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना क्र.टीपीएस-1298/941/सीआर-89/98/युडी-12, दि.25/08/2000 अन्वये मंजूर झालेली असुन ती दि.15/10/2000 पासून अंमलात आलेली आहे.<br>उपरोक्त विषयानुसार मौजे काशी, स.क्र.86/4, 86/5अ व 86/5ब ह्या जमिनी मिरा भाईंदर शहराच्या सुधारित मंजूर विकास योजनेनुसार आरक्षण क्र.364(बगीचा) व 30.00 मी. रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत होत आहे. सदरच्या दोन्ही आरक्षणाखालील 6221.55 चौ.मी. जमीन ही मे.विधी बिल्डकॉन प्रा.लि. यांनी महानगरपालिकेच्या नावे नोंदणीकृत दस्त क्र.टनन-7-13007-18 दि.14/09/2018 अन्वये नोंदणीकृत करारनामा करुन दिलेली आहे. सदर जागेची नोंद मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या नावे होणेसाठी नोंदणीकृत करारनामाचे अनुषंगाने पत्र क्र.मनपा/नर/4678/2018-19 दि.01/11/2018 अन्वये तहसिलदार, ठाणे यांना पत्र देण्यात आलेले होते. त्यानुसार फेरफार क्र.1582 दि.29/07/2019 अन्वये सदर क्षेत्राची नोंद महसुल अभिलेखो 7/12 उताऱ्यावर महानगरपालिकेच्या नावे झालेली आहे.<br>विषयाधीन आरक्षणाखालील 6221.55 चौ.मी. क्षेत्राचे विकास हक्क प्रमाणपत्राचे स्वरुपात मोबदला मिळणेकामी दि.01/09/2021 रोजोच्या पत्रान्वये आता मे.विधी बिल्डकॉन प्रा.लि. यांनी मागणी केलेली आहे. तथापि, प्रस्तावित जागेचा ताबा अद्याप मिळकत विभागाने घेतलेला नसल्याने, सदर आरक्षित जमिनीचा अतिक्रमण विरहित ताबा हा कुंपण भिंत व गेटसह मिळकत विभागाने देवून ताबा पावती त्यांच्या |

| | | |
|---|---|---|
| | | छायाचित्रांसह सादर करणे आवश्यक आहे. तद्नंतरच विकासकाम विकासहक्क प्रमाणपत्र देण्याचा विचार करण्यात येईल.<br>आरक्षण क्र.364 येथे झालेली तोडक कारवाई हा महापालिकेच्या दैनंदिन अतिक्रमण विरोधी कारवाईचा भाग होता. मा.आयुक्त, उपायुक्त यांनी पाहणी दौऱ्यावेळी आरक्षण क्र.364 येथे मोठया प्रमाणावर अवैध चाळींची बांधकामे होत असल्याचे निदर्शनास आणून दिले होते.<br>मा.महासभा दि.02/05/2008 (दि.18/04/2018 रोजीची तहकुब सभा), ठराव क्र.05 अन्वये आरक्षणाच्या जागेवरील अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे हटविणे बाबत धोरण पारित झालेले आहे. सदर धोरणानुसार संबंधित आरक्षण क्र.364 येथील अतिक्रमण निष्कासित करण्याची कारवाई करण्यात आलेली आहे. सदरचे आरक्षण जागेवरील अतिक्रमण हे सन 2019 नंतरचे असल्याचे Google Image वरुन स्पष्ट होत आहे. सोबत Google Image ची प्रत जोडण्यात येत आहे.<br>शासकीय नियमानुसार जे झोपडीधारक/ भोगवटाधारक पुनर्वसनात पात्र असतील त्यांचे नियमानुसार पुनर्वसन करण्यात येईल. |

(मारुती गायकवाड)
उपायुक्त (अतिक्रमण नियंत्रण)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मालमत्ता कराबाबत टिप्पणी.

मालमत्ता कर विभागाचे वसुलीकरीता करणेंत येणा-या उपाय योजनांबाबत.

वरील विषयानुसार अहवाल सादर करण्यात येतो की, मिरा भाईंदर महानगरपालिका मालमत्ता कर विभागाकडुन सन २०२१-२२ या वर्षातील मालमत्ता कराची मागणी देयके माहे मे २०२१ मध्ये तयार करुन वाटप करण्यात आलेली आहेत.

मालमत्ता कर विभागाचीप्रभागनिहायमालमत्तांचीसंख्या व मागणीखालीलप्रमाणेआहे.

| प्रभाग समिती क्रं. | मालमत्तांची संख्या | एकुण मागणी |
|---|---|---|
| १ | ४९८०६ | २०१८०३१८८ |
| २ | २३५६६ | ७८८२१६७२ |
| ३ | ६८८९६ | २२३१०६५८५ |
| ४ | ११५६१४ | ८५४३४७५४२ |
| ५ | ४१३५६ | २०१४४६९६७ |
| ६ | ६८६३८ | ६६७७६८८९७ |
| मोबाईल टॉवर | ५७७ | ६१२७६२७८३ |
| एकुण | ३६८४५३ | २८४००५७६३४ |

मालमत्ता कराची देयक वाटप केल्यानंतर कर वसुली ही एकुण १२ वसुली केंद्रामार्फत तसेच ऑनलाईन वसुली ही मनपा संकेतस्थळ www.mbmc.gov.in व MyMBMC हे ॲप्लिकेश विकसीत करण्यात आलेले आहे.

त्यानुसार कर विभागाकडुन माहे नोव्हेंबर २०२१ पर्यंत प्रभाग निहाय खालील प्रमाणे वसुली करण्यात आलेली आहे.

| प्रभाग समिती क्रं. | एकुण वसुली |
|---|---|
| १ | ९०२०३९२४ |
| २ | ४८५४३४८४ |
| ३ | ११४०२४१५२ |
| ४ | ३१६१६००४४ |
| ५ | ९६०७३४७० |
| ६ | २१३२९७७३१ |
| मोबाईल टॉवर | ४८९१७४०१ |
| एकुण वसुली | ९२७२२०२०६ |

वरील प्रमाणे कर विभागाने एकुण रक्कम रु. ९२,१८,३७,५६०/- वसुली करण्यात आलेली असुन प्रभाग समितीची वसुलीची टक्केवारी ही ३९.१९% असुन मोबाईल टॉवरची वसुलीची टक्केवारी ही ७.९८% इतकी आहे.

सन २०२१-२२ या वर्षातील वसुलीची सन २०२०-२१ या वर्षाचे अनुषंगाने तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

माहे नोव्हेंबर अखेर

| सन २०२०-२१ | | सन २०२१-२२ | |
|---|---|---|---|
| मागणी | वसुली | मागणी | वसुली |
| २७१८३२८५८८ | ७८८०२३८६६ | २८४००५७६३४ | ९२७२२०२०६ |

वरील प्रमाणे तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन केले असता सन २०२०-२१ च्या तुलनेत सन २०२१-२२ या वर्षात कर विभागा मार्फत एकुण रक्कम रु. १३.९१ कोटी जास्त वसुली करण्यात आलेली आहे. मालमत्ता कराची प्रभावी वसुली होणेकरीता मालमत्ता कर विभागमार्फत खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

१. मोठ्या थकबाकीदारांची यादी तयार करुन या मालमत्ता धारकांना वसुली कर्मचारी यांचेकडुन वसुली करीता भेटी देण्यात येत आहे.

२. थकबाकीदार मालमत्ता धारक यांचे मालमत्तेची जप्तीची कार्यवाही सुरु करण्यात आलेली असुन एकुण ३५१ थकबाकीदार मालमत्ता धारक यांना जप्तीकरीताचे अधिपत्र बजाविणेंत आलेले असुन त्यांची एकुण थकबाकी रक्कम रु.९,७६,८५,६९७/- इतकी आहे. या पैकी आजतायागत रक्कम रु. २४,८९,७५२/- वसुली करण्यात येवुन उर्वरती मालमत्ता धारक यांचे मालमत्ता जप्तीची प्रकिया प्रगतीपथावर आहे.

३. थकबाकीदार मालमत्ता धारक यांचे मालमत्तेची जप्तीची कार्यवाही सुरु करण्यात आलेली असुन एकुण ३५१ थकबाकीदार मालमत्ता धारक यांना जप्तीकरीताचे अधिपत्र बजाविणेंत आलेले असुन त्यांची एकुण थकबाकी रक्कम रु.९,७६,८५,६९७/- इतकी आहे. या पैकी आजतायागत रक्कम रु. २४,८९,७५२/- वसुली करण्यात येवुन उर्वरती मालमत्ता धारक यांचे मालमत्ता जप्तीची प्रकिया प्रगतीपथावर आहे.

४. प्रभाग समिती वसुली कर्मचारी वसुली करीता यांनी माहे नोव्हेंबर अखेर पर्यंत ३९,३०० मालमत्तांना वैयक्तीक भेटी दिलेल्या आहेत.

५. माहे नोव्हेंबर अखेर पर्यंत ४,८३३ इमारतींना थकीत कराचा भरणा करणेंकरीता नळ खंडीत करणे बाबत नोटीस बजाविणेंत आलेल्या आहेत.

६. वसुल न होणा-या मालमत्तांची पडताळणी केली असता तोडण्यात आलेल्या / दुबार मालमत्तांची प्रभाग निहाय एकुण १५१६६ मालमत्तांची सुची तयार करण्यात आलेली असुन, या वसुल न होणा-या मालमत्तांचे निर्लेखन प्रस्ताव मा. स्थायी समिती पुढे सादर करण्याची कार्यवाह अंतीम टप्प्यात आहे. त्यामुळे मागणीत निर्माण झालेला नाहक फुगवटा कमी होऊन वसुलीचे प्रमाण वाढेल.

७. सन २०२१-२२ या चालु वर्षातील मालमत्ता कर विहीत मुदतीत न भरणा मालमत्ता धारक यांना बजाविणेंत येणा-या अंतिम नोटीसची छपाई पुर्ण करण्यात आलेली असुन, थकबाकीदार मालमत्ता धारक यांना अंतिम नोटीस बजाविणेंची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे. अतापर्यंत एकुण १८७ मालमत्तांना नोटीस बजाविणेंत आलेल्या आहे.

८. मालमत्ता कर थकीत असणा-या मालमत्ता धारक यांचे मोबाईल नंबर संकलीत करण्याची कार्यवाही सुरु असुन, सदर सुची अंतिम झाल्यावर थकबाकीदार मालमत्ता धारक यांना थकीत कराचा भरणा करणेंकरीता SMS पाठविण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

(रवि पवार)
उपायुक्त (कर)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा बुधवार दि.01/12/2021

## अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग

// टिप्पणी //

विषय क्र.77 :- महापालिकेच्या काही विभागात निविदा न काढता ठेका पध्दतीने मजुर व कर्मचारी घेणेकरीता ठराविक ठेकेदारांना प्रशासनाने चुकीच्या पध्दतीने मजुर व कर्मचारी पुरवठा करण्याचे कार्यादेश दिलेले आहेत, सदर प्रकरणी जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणेबाबत निर्णय घेणे.

उपरोक्त विषया संदर्भात अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या क्षेत्रात अनधिकृत फेरीवाल्यांवर परिणामकारक कारवाई करणे बाबत सन्मानीय सदस्यांकडून वारंवार मागणी होत आहे. याकरीता प्रभाग समिती कार्यालय क्र. 1 ते 6 मध्ये एकुण 60 मजुर उपलब्ध् करुन देणेबाबतचे प्रस्तावित होते.

मा. स्थायी समिती सभा दि.05/05/2021 ठराव क्र. 18 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील, कच्चे, पक्के नाले पावसाळ्यापुर्वी सफाई/ खोदाई करणेकामी हंगामी कंत्राटी मजुर पुरवठा करणे कामाच्या मे. एम. ई. प्रोजेक्ट लि. यांच्या निविदेतील दर रुपये 999/- प्रती मजुर/ प्रती दिवस यास मंजूरी प्राप्त आहे. सदर दराप्रमाणे कंत्राटदार मे. एम. ई. प्रोजेक्ट लि. यांना प्रभाग समिती कार्यालय क्र. 1 ते 6 मध्ये अनधिकृत फेरीवाले हटविणेकामी एकुण 60 मजुर उपलब्ध् करुन देणेस व याकामी होणारा खर्च सन 2021-22 या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील लेखाशिर्षक - आरोग्य व सोयी 4) वार्ड साफ -सफाई यामधील तरतूदीतून करणेस मा. आयुक्त महोदय यांनी मान्यता दिली आहे. त्यानुसार दि.11/10/2021 रोजी पासून संबंधीत ठेकेदाराकडून अनधिकृत फेरीवाले हटविणेकामी 60 मजुरांचा पुरवठा करुन दिला जात आहे. याकामी दि.31/03/2022 रोजी पर्यंत रक्कम रु.1.02 कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समिती सभेपुढे अवलोकनार्थ सादर करण्यात आलेला आहे.

(मारुती गायकवाड)
उप-आयुक्त (अतिक्रमण नियंत्रण)
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा.महासभा दि.01/12/2021 सभ सुचना क्र.06**

**विषयपत्रिका**

| प्रकरण क्र. | विषय | माहिती |
|---|---|---|
| 78 | परिवहन उपक्रमात कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणेकामी अवलंबिलेली पध्दत इतर विभागात नियुक्त करताना अवलंबिली जात नाही याबाबत विचार विनीमय करणे. | नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.36(भाग-1)/16/नवि-28, दि. 26 फेब्रुवारी, 2019 नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विभागांकरीता विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यास व महानगरपालिकेच्या आकृतीबंधास मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुसार परिवहन विभागाकरीता कनिष्ठ अभियंता (मॅकॅनिकल) या संवर्गाची 02 पदे मंजूर असुन, सदर पदास शासन निर्णय क्रमांक-बीसीसी-2021/प्र.क्र.387/16-ब(ए), दि.06 जुलै, 2021 अन्वये आरक्षण लागु होत आहे. त्यामुळे परिवहन विभागासाठी पदभरती करताना सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने कार्यवाही करुन ठोक मानधनावर कनिष्ठ अभियंता (मॅकॅनिकल) या पदावर दि.01/11/2021 रोजी नेमणूक करण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. तसेच यापुर्वी वैद्यकीय आरोग्य विभागात ठोक मानधनावर बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी यांची दि.21/05/2013 व दि.16/06/2017 तसेच अधिपरिचारीका यांची दि.27/06/2016 रोजी पदभरती करताना आरक्षणानुसार पदभरती करण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.<br>इतर विभागात कर्मचाऱ्यांची आवश्यकता असल्यास निविदा प्रक्रिया करुन ठेकापध्दतीने ठेकेदारामार्फत कर्मचारी पुरवठा करण्याची कार्यवाही करण्यात येते. |

(मारूती गायकवाड)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका